## "जिल्हा रस्ता सुरक्षा समिती"
## मा.विभागीय आयुक्त कार्यालय, विधानभवन सभागृह, पुणे
## बैठक क्रमांक ३
## दिनांक २९.०८.२०१८ वेळ दुपारी ०४.०० वाजता
## इतिवृत्त

मा.खासदार श्री.शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २९.०८.२०१८ रोजी दुपारी ०४.०० वाजता विधानभवन सभागृह, पुणे येथे बैठक संपन्न झाली बैठकीची उपस्थिती खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | समिती सदस्य | विभाग |
|---|---|---|
| १ | मा.खासदार श्री.शिवाजीराव आढळराव पाटील | अध्यक्ष |
| २ | मा.खासदार श्री.अमर साबळे, राज्यसभा सदस्य | सदस्य |
| ३ | मा.खासदार श्री.अनिल शिरोळे, लोकसभा सदस्य | सदस्य |
| ४ | मा.आमदार श्री.भिमराव तापकिर | सदस्य |
| ५ | मा.श्री.रमेश काळे, अपर जिल्हाधिकारी, पुणे (मा.जिल्हाधिकारी, पुणे यांच्या वतीने) | सदस्य |
| ६ | मा.श्री.सुरज मांढरे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| ७ | मा.श्री.संदिप पाटील, पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण | सदस्य |
| ८ | मा.श्री.बी.आय.आजरी, प्रादेशिक परिवहन अधिकारी | सदस्य |
| ९ | मा.श्रीमती.तेजस्वी सातपुते, पोलीस उप आयुक्त (वाहतूक), पुणे | सदस्य |
| १० | मा.श्रीमती.स्वार्तना पाटील, पोलीस उप आयुक्त (वाहतूक), पिंपरी-चिंचवड | सदस्य |
| ११ | मा.श्री.प्रविणकुमार देवरे, मुख्य अभियंता, पीएमआरडीए, पुणे | सदस्य |
| १२ | मा.श्री.राजेंद्र रहाणे, अधिक्षक अभियांता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे | सदस्य |
| १३ | मा.श्री.सुहास चिटणीस, प्रकल्प निर्देशक, पकाई, पुणे (एनएचएआय) | सदस्य |
| १४ | मा.श्री.विवेकानंद वाखारे, सहा.पोलीस आयुक्त (वाहतूक) पुणे शहर | सदस्य |
| १५ | उप अभियंता, एमएसआरडीसी, पुणे | सदस्य |
| १६ | मा.श्री.संजय राऊत, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे | सदस्य सचिव |
| १७ | मा.श्री.आनंद पाटील, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पिंपरी-चिंचवड | सदस्य सचिव |
| १८ | मा.श्री.अनिल वळीव, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, बारामती | सदस्य सचिव |
| १९ | मा.श्री.विनोद सगरे, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे | सदस्य |
| २० | जिल्हा शल्य चिकीत्सक, औंध | सदस्य |
| २१ | मा.डॉ.मनजित संत्रे, वैद्यकीय उप अधिक्षक, ससुन हॉस्पीटल, पुणे | सदस्य |
| २२ | मा.श्रीमती.ज्योती कदम, उप विभागीय अधिकारी, हवेली | सदस्य |
| २३ | मा.श्री.भाऊसाहेब गलांडे, उप विभागीय अधिकारी, पुणे शहर / शिरुर | सदस्य |
| २४ | मा.श्री.जयंत कर्णे, सहाय्यक जिल्हा माहिती अधिकारी, पुणे | सदस्य |
| २५ | मा.श्री.दिपक घोडे, एमएसआरटीसी, पुणे | सदस्य |
| २६ | मा.श्री.दत्तात्रय माने, पीएमपीएमएल, पुणे | सदस्य |
| २७ | मा.श्री.वसंत मोरे, पोलीस निरिक्षक, वाहतूक शाखा, पुणे ग्रामीण | सदस्य |
| २८ | मा.श्री.धन्यकुमार गोडसे, पोलीस निरिक्षक, चाकण पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण | सदस्य |
| २९ | मा.श्री.किशोर म्हसवडे, पोलीस निरिक्षक, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड | सदस्य |
| ३० | मा.श्री.प्रताप धापटे, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे | सदस्य |
| ३१ | मा.श्री.प्रफुल्ल दिवान, एनएचएआय, पुणे | सदस्य |
| ३२ | मा.श्री.मिलिंदकुमार बाबळे, एनएचएआय, पुणे | सदस्य |
| ३३ | मा.श्री.धनुश्री झोडगे, उपमहाप्रबंधक, एनएचएआय, नाशिक | सदस्य |
| ३४ | मा.श्री.मिलिंद बोरभाई, कार्यकारी अभियंता, पूर्व विभाग, पुणे | सदस्य |
| ३५ | मा.डॉ.प्रभाकर देसाई, संचालक, राष्ट्रिय सेवा योजना | निमंत्रित सदस्य |
| ३६ | मा.श्री.अतुल ढोरे, कार्यकारी अभियंता, एमआयडीसी, पिंपरी-चिंचवड | निमंत्रित सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ३७ | मा.श्री.बी.व्ही.राऊनप, उप अभियंता, एमआयडीसी, पिंपरी-चिंचवड | निमंत्रित सदस्य |
| ३८ | मा.श्रीमती.प्रतिभा ना.हरिभक्त, विभागीय समादेशक, आरएसपी, पुणे | निमंत्रीत सदस्य |
| ३९ | मा.श्री.रमेश ज्ञानेश्वर महाडीक, जिल्हा समादेशक, पुणे | निमंत्रीत सदस्य |
| ४० | मा.श्री.शेखर घोगरे, नगराध्यक्ष, चाकण नगरपालिका | निमंत्रीत सदस्य |
| ४१ | मा.श्री.प्रकाश गोरे, उप नगराध्यक्ष, चाकण नगरपालिका | निमंत्रीत सदस्य |
| ४२ | मा.श्री.एन.जे.पोतदार, कार्यासन अधिकारी, सा.बां. उत्तर विभाग | सदस्य |
| ४३ | मा.श्री.एम.धोपटे, मुख्य अभियंता, पुणे महानगरपालिका | सदस्य |
| ४४ | मा.श्री.पी.जे.जाधव, उप विभागीय अभियंता, सा.बां. पूर्व विभाग | सदस्य |
| ४५ | मा.श्री.ललित बोडे, पुणे महानगरपालिका | सदस्य |
| ४६ | मा.श्री.माणिक देवकर, सहा.प्रशासकीय अधिकारी, शिक्षण विभाग, पुणे मनपा | सदस्य |
| ४७ | मा.श्री.सारंग पुरुषोत्तम जोशी | अशासकीय सदस्य |
| ४८ | मा.श्री.अरुण मारुती पवार | अशासकीय सदस्य |
| ४९ | मा.श्री.विठ्ठल दत्तात्रय जाधव | अशासकीय सदस्य |
| ५० | मा.श्री.राजेंद्र नारायण पायगुडे | अशासकीय सदस्य |
| ५१ | मा.श्री.अशोक रामदास बाजारे | अशासकीय सदस्य |
| ५२ | मा.श्री.रणजित गाडगीळ | अशासकीय सदस्य |
| ५३ | मा.श्री.धनंजय वाठारकर | अशासकीय सदस्य |
| ५४ | मा.श्री.बी.के.सिंग, रिलायन्स | सदस्य |
| ५५ | मा.श्री.अनिलकुमार, खेड-सिन्नर अभियंता | सदस्य |
| ५६ | मा.श्रीमती.स्नेहा हब्बू, उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, पुणे | सदस्य |
| ५७ | मा.श्री.आर.एस.ठाणगे, सह अभियंता, सा.बां.दक्षिण विभाग | सदस्य |
| ५८ | मा.श्री.देविदास दरेकर, जिल्हा परिषद सदस्य | निमंत्रित सदस्य |
| ५९ | मा.श्री.गुलाब पारखे, जिल्हा परिषद सदस्य | निमंत्रित सदस्य |
| ६० | मा.श्री.राम गावडे, जिल्हाध्यक्ष, शिवसेना | निमंत्रित सदस्य |
| ६१ | मा.श्री.धीरज मुटके, आरोग्य विभाग | सदस्य |

बैठक दुपारी ठीक ०४.०० वाजता सुरु झाली. सदस्य सचिव श्री.संजय राऊत यांनी उपस्थितांचे स्वागत व प्रास्तावीक केले. मा.अध्यक्ष यांना सर्व सदस्यांनी स्वतःचा परिचय करून दिला. नवनियुक्त अशासकीय सदस्यांचे स्वागत केले.

| विषय क्र. | विषय | चर्चा व निर्णय | संबंधीत विभाग |
|---|---|---|---|
| १ | मागील बैठक दिनांक १८.०४.२०१८ चे इतिवृत्त वाचून कायम करणे. | मागील बैठक दिनांक १८.०४.२०१८ चे इतिवृत्ताचे वाचन सदस्य सचिव यांनी केले. मा.अध्यक्ष महोदयांनी ठळक मुद्यांवर चर्चा करण्याचे सुचित केले.<br>• पुणे जिल्ह्याचा विस्तार विचारात घेता ग्रामीण भागाकरिता प्रांत अधिकारी यांच्या अखत्यारित उपसमिती गठीत केल्यास जिल्हा रस्ता सुरक्षा समितीचे कामकाज प्रभावीपणे होईल व समन्वय साधणे सोयीचे होईल. याकरिता सर्व संबंधीत विभागांनी त्यांचेकडील अधिकाऱ्यांचे नामनिर्देशन सदस्य सचिव यांचेकडे पाठविण्यात यावे.<br>• कृती आराखडा तयार करण्याच्या सुचना मा.अध्यक्ष यांनी दिल्या.<br>• मा.खासदार श्री.अमर साबळे यांनी बैठकीचे इतिवृत्तावर केलेल्या कार्यवाहीच्या अहवालाचे अवलोकन केले. मा.अध्यक्ष यांच्या | सदस्य सचिव, जिल्हा रस्ता सुरक्षा समिती |

| | | | |
|---|---|---|---|
| | | आदेशानुसार ज्या विभागांकडील कार्यपूर्ती अहवाल अप्राप्त आहेत त्यांना कर्तव्यात कसूर केलेबाबत ज्ञापन बजावून खुलाशासह अहवाल तात्काळ मागविण्यात यावेत असे नमुद केले असता, मा.अध्यक्ष यांनी त्यास मान्यता दिली.<br>वरील अंशतः बदल स्विकारून इतिवृत्त कायम करण्यात आले. | |
| २ | जिल्हा रस्ता सुरक्षा समितीमध्ये अशासकीय सदस्यांची नियुक्ती. | मा.अध्यक्ष यांनी नामनिर्देशीत केलेल्या खालील २ अशासकीय सदस्यांची समितीमध्ये नियुक्ती करण्यात आली.<br>१) श्री.रणजित गाडगीळ, परिसर संरक्षण संवर्धन संस्था, पुणे<br>२) श्री.धनंजय विनोद वाठारकर, संस्थापक अध्यक्ष, ग्राहक सेवा संस्था महाराष्ट्र राज्य. | - |
| ३ | पुणे-पिंपरी-चिंचवड शहर व पुणे ग्रामीण भागातील वाहतूकीची समस्या गंभीर होत असल्याबाबत. | पुणे, पिंपरी-चिंचवड शहर तसेच पुणे ग्रामीण भागामधील वाहतूकीची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. वाढते शहरीकरण, वाढती लोकसंख्या, वाहनांची वाढती संख्या, रस्त्यांची लांबी-रुंदी व शहराचे सुशोभीकरण / विकासकामे, मेट्रो / महामेट्रोची कामे, बीआरटी, महामार्गाचे रुंदीकरण, आणि महामार्गावरील अतिक्रमणे या बाबींवर चर्चा करण्यात आली. वर नमुद घटकांमुळे पुणे शहर व ग्रामीण भागामध्ये नियमितपणे रस्त्यावर वाहतूक कोंडी होत असते. परिणामी इच्छित ठिकाणी पोहोचण्यास विलंब होऊन आवश्यकतेपेक्षा जास्त इंधनाचा वापर होत आहे. त्यामुळे वायुप्रदुषण/ध्वनीप्रदुषण वाढून आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. तसेच पुणे जिल्ह्यात मुंबई, नाशिक, अहमदनगर, सोलापूर, सातारा या जिल्ह्यांना जोडणाऱ्या सर्व राष्ट्रीय महामार्गांचा समावेश आहे. सदर महामार्गांवर व त्याचप्रमाणे इतर राज्य मार्गांवर मोठ्या प्रमाणावर अपघात होत आहेत.<br><br>**<u>कारणे :</u>**<br>• पुणे जिल्ह्यात दररोज सरासरी नव्याने नोंदणी होणारी कमाल १००० वाहने.<br>• रस्त्यांच्या विस्तारीकरणास मर्यादा.<br>• अनियंत्रित पार्किंग<br>• अतिक्रमणे<br>• रस्त्यांची दुरावस्था<br>• नागरीकांमध्ये वाहतूकीबाबत स्वयंशिस्तीचा अभाव.<br>• वाहतूक नियमनाकरिता उपलब्ध असलेले अपुरे मनुष्यबळ<br>• मेट्रो / महामेट्रो व बीआरटी प्रकल्प<br>• अपुरी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था | महानगरपालिका<br>नगरपालिका<br>पोलीस विभाग<br>बांधकाम विभाग<br>पीएमआरडीए<br>एनएचएआय<br>रस्ते विकास महामंडळ |

<table>
<tr>
<td></td>
<td></td>
<td>
<table>
<tr><th colspan="4">मागील चार वर्षातील पुणे जिल्ह्यातील अपघातांचा गोषवारा</th></tr>
<tr><th>वर्ष</th><th>अपघात</th><th>मृत</th><th>जखमी</th></tr>
<tr><td>२०१५</td><td>४०७८</td><td>१५४३</td><td>३३४८</td></tr>
<tr><td>२०१६</td><td>३७३७</td><td>१४७१</td><td>२९५३</td></tr>
<tr><td>२०१७</td><td>३९७५</td><td>१३९८</td><td>३२८१</td></tr>
<tr><td>जुलै २०१८ अखेर</td><td>२२६१</td><td>८९५</td><td>१८३६</td></tr>
<tr><td>एकुण</td><td>१४०५१</td><td>५३०७</td><td>११४१८</td></tr>
</table>
<br>
<u>उपाययोजना :</u><br>
• सार्वजनिक वाहतूकीचे सक्षमीकरण करणे.<br>
• शहरांतर्गत अपुर्ण अवस्थेतील बीआरटी योजना लवकरात लवकर कार्यान्वीत करणे.<br>
<br>
• मेट्रो प्रकल्प कार्यान्वीत होण्यासाठी संबंधीत कामे युध्दपातळीवर पूर्ण करणे.<br>
• रिंगरोड तयार करणे.<br>
<br>
• पीएमपीएमएल च्या अपघातांकरिता अभ्यासगट गठीत करणे.<br>
<br>
• पादचारी सुरक्षा धोरणास महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत मान्यता देण्यात आलेली आहे त्याचा आराखडा तयार असून त्याचा वापर व्हावा.<br>
यासारख्या उपाययोजना चर्चेदरम्यान उपस्थितांनी सुचविल्या.
</td>
<td>
<br>
महानगरपालिका पुणे व पिंपरी-चिंचवड,पीएमपीएमएल<br>
<br>
पीएमआरडीए, महानगरपालिका पुणे व पिंपरी-चिंचवड<br>
<br>
पीएमपीएमएल, परिवहन विभाग, पोलीस विभाग, सीआयआरटी, एआरएआय<br>
<br>
महानगरपालिका पुणे व पिंपरी-चिंचवड
</td>
</tr>
<tr>
<td>४</td>
<td>पुणे-सातारा महामार्गाची सद्यस्थिती.</td>
<td>
• सदर महामार्गावरील ५-६ ठिकाणच्या उड्डाणपुलांचे काम ठप्प आहे.<br>
• सेवा रस्त्यांची दुरुस्ती करणे, रस्त्यालगतची गटारे अच्छादीत करणे आवश्यक आहे.<br>
• वाहतूक कोंडीचा नागरीकांना त्रास होत असून, त्याचा ताण वाहतूक पोलीसांवर येत आहे.<br>
• गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरांतर्गत रस्ते दुरुस्तीबाबत तातडीने कार्यवाही करावी.<br>
• खडकवासला चौपाटी येथे शनिवार-रविवार व सुट्टीच्या दिवशी गर्दी होत असल्यामुळे वाहतूकीची कोंडी होत असते. तेथे पोलीस कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी. तेथील अतिक्रमणे काढावीत.
</td>
<td>एनएचएआय<br>महामार्ग पोलीस, पुणे</td>
</tr>
</table>

| | | | |
|---|---|---|---|
| | | उपरोक्त बाबींवर कायमस्वरुपी उपाययोजना करण्याची मागणी मा.आमदार श्री.भिमराव तापकीर यांनी केली. | |
| | पुणे-नाशिक महामार्ग | महामार्गाचे रुंदीकरण, महामार्गावरील अतिक्रमणे, पार्किंग, साईडपट्ट्या न भरल्याने झालेले खड्डे, नारायणगांव, राजगुरुनगर, चाकण इ. प्रमुख गावामधून जाणाऱ्या महामार्गावर रस्ता दुभाजक नसल्याने व वाहन चालक स्वयंशिस्तीने वाहन चालवित नसल्याने वाहतूक कोंडी नित्याची झाली आहे. पिंपरी-चिंचवड येथे नव्याने पोलीस आयुक्तालय झाल्याने उपलब्ध असलेला पोलीस विभागाचा अपुरा कर्मचारीवर्ग यामुळे वाहतूक नियमन करणे जिकीरीचे झाले आहे. तेथे पूर्वी कार्यरत असलेले ट्राफीक वॉर्डन पुन्हा कार्यरत करावेत. याबाबत नगराध्यक्ष, चाकण यांनी सांगितले.<br>मा.पोलीस अधिक्षक यांनी नागरीकांनी स्वत: मागील सप्ताहामध्ये वाहतूकीचे नियमन केले त्याचे स्वागत केले. ट्राफीक वॉर्डन व पोलीस कर्मचारीवर्ग लवकरच वाढविण्यात येईल. अतिक्रमणे काढण्यात येत असून, साईडपट्या भरुन घेण्यात येतील.<br>मा.अध्यक्ष यांनी पुणे-नाशिक रस्ता रुंदीकरणाबाबतची माहिती सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) विभाग यांचेकडून घेतली. तात्पुरत्या स्वरुपात दुभाजक लावावेत व साईडपट्या भरुन घ्याव्यात अशा सुचना दिल्या. | एनएचएआय<br>महामार्ग पोलीस<br>वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड<br>पोलीस विभाग (ग्रामीण)<br>सार्वजनिक बांधकाम विभाग |
| ५ | द्रुतगती महामार्गावरील अपघात कमी होण्याबाबत तसेच उपाययोजना राबविण्याबाबत चर्चा करणे. | इंटेलिजंट ट्रॅफिक मॉनिटरिंग सिस्टीम कार्यान्वीत करणे, ड्रोन कॅमेऱ्यांचा वापर करणे, स्पीड गन / सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे वेगाचे / लेनचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करावी, शहरात पादचारी सुरक्षेला प्राधान्य द्यावे असे मा.खासदार श्री.अनिल शिरोळे यांनी सांगितले. | रस्ते विकास महामंडळ<br>महामार्ग पोलीस |
| ६ | पुणे जिल्ह्यात महिन्यातील एक दिवस 'नो हॉर्न डे' संकल्पना राबविणे. | रस्ते अपघातासोबतच ध्वनीप्रदुषण ही एक मोठी सामाजिक समस्या बनली आहे. **पुणे शहरात दररोज साधारणपणे 'एक कोटी' वेळा हॉर्न वाजविले जातात**. हॉर्नद्वारे होणाऱ्या ध्वनीप्रदुषणाचे निर्मुलन करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत मा.उच्च न्यायालय मुंबई तसेच मा.राष्ट्रीय हरित लवाद यांनी वेळोवेळी निर्देश दिलेले आहेत. याकरिता शालेय तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे प्रबोधन करणे अत्यंत महत्वाचे आहे. परिवहन विभाग संपूर्ण राज्यात 'हॉर्न नॉट ओके प्लीज' ही संकल्पना रुजविण्यासाठी दिनांक १२.०९.२०१८ रोजी 'नो हॉर्न डे' अभियान राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत हॉर्न वाजविण्याचे दुष्परिणाम व हॉर्न न वाजवता वाहन चालविण्याचे महत्व याबाबत विद्यार्थ्यांमध्ये तसेच नागरीकांमध्ये प्रबोधन करण्यात येणार आहे. या अभियानात परिवहन विभाग, पोलीस विभाग, शासनाचे इतर सर्व विभाग, प्रसारमाध्यमे, शाळा / महाविद्यालये, एनजीओ, रोटरी क्लब इत्यादींनी सक्रीय सहभाग दर्शविला आहे. | परिवहन विभाग<br>पोलीस विभाग<br>पुणे विद्यापीठ<br>शिक्षण विभाग |

<table>
<tr><td>७</td><td colspan="3">मा.अध्यक्ष महोदय यांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयावर चर्चा.</td></tr>
<tr><td></td><td>१) वाहतूक सुरक्षा अंमलबजावणीकरिता कायमस्वरुपी पथक निर्माण करणे / निधी</td><td>शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच नागरीकांना रस्ता सुरक्षेबाबत निरंतर प्रबोधन करण्यासाठी एक रस्ता सुरक्षा पथक पुर्ण वेळेसाठी निर्माण करण्यात यावे. या पथकात एक वाहन, दोन मोटार वाहन निरिक्षक, एक सहाय्यक व एक चालक यांचा समावेश असावा. त्याचप्रमाणे प्रचारसाहित्य, बॅनर्स, प्रोजेक्टर, लॅपटॉप, इ. साधनसामुग्री उपलब्ध करण्यात यावी. अशी एकुण ४ पथके सुरु करण्याबाबत चर्चा करण्यात आली.<br>एका पथकाचे ढोबळ अंदाजपत्रक खालीलप्रमाणे आहे.
<table>
<tr><th>तपशिल</th><th>अंदाजे खर्च रु.</th></tr>
<tr><td>वाहन</td><td>१० लाख</td></tr>
<tr><td>लॅपटॅाप, प्रोजेक्टर</td><td>१ लाख</td></tr>
<tr><td>प्रचारसाहित्य छपाई</td><td>१० लाख (वार्षिक)</td></tr>
<tr><td>इंधन</td><td>६ लाख (वार्षिक)</td></tr>
<tr><td>पथनाट्य, जाहिरात, फिल्म तयार करणे इ.</td><td>१० लाख (वार्षिक)</td></tr>
<tr><td>एकुण</td><td>३७ लाख</td></tr>
</table>
परिवहन विभागासाठी / पुणे जिल्ह्यासाठी वरीलप्रमाणे निधी मंजूर होण्यासाठी प्रस्तावीत करण्यात आले होते. याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत मा.अध्यक्षांनी सुचना दिल्या. तसेच वाहतूक पोलीस शाखा पुणे व पिंपरी-चिंचवड यांचेकडे मनुष्यबळ उपलब्ध असून, वरीलप्रमाणे सुविधा व निधी उपलब्ध झाल्यास तात्काळ काम सुरु करता येईल असे सांगीतले.</td><td>परिवहन विभाग<br>वाहतूक विभाग<br>पोलीस विभाग</td></tr>
<tr><td></td><td>२) बैठकीदरम्यान प्राप्त निवेदनांवर चर्चा</td><td>मा.खासदार श्रीमती.वंदना चव्हाण राज्यसभा सदस्य व मा.प्रा.सौ.मेधाताई विश्राम कुलकर्णी, विधानसभा सदस्य, कोथरुड मतदारसंघ यांचेकडून प्राप्त निवेदनांचे वाचन सदस्य सचिव यांनी केले. त्यामध्ये नमुद विषयांवर कार्यवाही करण्याचे आदेश मा.अध्यक्षांनी दिले.</td><td>सार्वजनिक बांधकाम विभाग<br>महानगरपालिका<br>एनएचएआय</td></tr>
</table>

श्री.संजय राऊत, सदस्य सचिव, जिल्हा रस्ता सुरक्षा समिती तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी पुणे यांनी सर्वांचे आभार मानले व मा.अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

**सदस्य सचिव**
**जिल्हा रस्ता सुरक्षा समिती तथा**
**उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,**
**पुणे**

**अध्यक्ष,**
**जिल्हा रस्ता सुरक्षा समिती तथा**
**मा.खासदार, शिरुर लोकसभा**
**मतदारसंघ, पुणे**